# योहानेस गुटेनबर्ग

(1400 -1468)

# पहिला छापखाना







योहानेस जर्मनीतील *माईन्झ* शहरात वाढला. त्याकाळी पुस्तके उपलब्ध नसल्याने त्याला कुणी पुस्तके वाचून गोष्टी ऐकवू शकत नसत.







योहानेसने फक्त बायबल हे एकच पुस्तक पाहिले होते. तो स्थानिक मठातील भिक्षुंना बायबलची प्रत हाताने लिहून काढताना पाहात असे. त्याकाळी लाकडी ठोकळ्यांनी छपाई करत असत. पण त्याला खूप वेळ लागत असे.




मोठे झाल्यावर योहानेस सोनारकाम शिकला. तो एका टांकसाळीत सोन्याची नाणी पाडण्याचे काम करू लागला.




नाणी पाडण्याचे काम करताना त्याच्या मनात तशाच पद्धतीने अक्षरांचे साचे बनवण्याची कल्पना घोळू लागली.




पण छपाईची अवजारे, शाई आणि धातू खूप महाग होते.




तीन धनवान व्यक्तिंनी योहानेसला पैसे उधार दिले.




त्यांच्यातील एकाचा मृत्यू झाला. इतर दोघांनी योहानेसचा शोध चोरण्याचा प्रयत्न केला.




शेवटी योहानेसने बालपणी उराशी बाळगलेले स्वप्न पूर्ण केले. इ.स. 1456 मध्ये फस्टकडे नोकरी करताना त्याने बायबलची पहिली प्रत छापली. एक प्रत लिहायला एका भिक्षुला तब्बल 30 वर्षे लागली असती. पण योहानेसने एकाच वर्षात बायबलच्या 300 प्रती छापल्या. इ.स. 1500 पर्यंत साऱ्या युरोपभर छापखाने दिसू लागले. तिथे सुमारे 30,000 पुस्तके छापली गेली. परिणामी, ज्ञानाचा प्रसार अत्यंत वेगाने झाला.